# महाराष्ट्र शासन
## राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई

८ वा मजला, न्यु एक्सलसिअर इमारत, ए.के.नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१
ई-मेल-maharashtra.cetcell@gmail.com वेबसाईट:www.mahacet.org

**महत्वाचे / तातडीने**

क्र. रासप्रपक/प्रवेश/आयुष/२०१८/१६०८ दिनांक : 13 NOV 2018

**"जाहिर सूचना"**

**विषय : शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील आयुष अभ्यासक्रमाच्या संस्था स्थरावरील प्रवेश प्रक्रियेबाबत...**

**संदर्भ : राज्य समााईक प्रवेश परीक्षा कक्षाचे पत्र क्र. State CET Cell/NEET UG 2018/Institutional level/Notice No. 40/1561/2018, दिनांक २/११/२०१८.**

विषयांकित प्रकरणास अनुसरुन राज्यातील सर्व खाजगी विनाअनुदानित आयुष अभ्यासक्रमाच्या (आयुर्वेद, होमिओपॅथी व युनानी पदवी) संस्था स्थराववरील प्रवेश प्रक्रिये संदर्भात राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या संदर्भाधीन सुचनेचे तंतोतंत पालन करणे सर्व संबंधीतांना बंधनकारक आहे.

राज्य समााईक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे संस्था स्थरावरील प्रवेश प्रक्रिया सुरळीत व पारदर्शकरित्या पार पाडण्याकरिता सर्व संबंधीत महाविद्यालयामध्ये "निरिक्षकांची" नियुक्ती करण्यात आलेली आहे, तसेच राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या मुख्यालयात दिनांक १३/११/२०१८ ते १५/११/२०१८ या कालावधीत **"तक्रार कक्ष (WAR-ROOM)"** स्थापित करण्यात आलेला आहे, याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

शुल्क नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांनी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता निश्चित केलेल्या शुल्काचा तपशील सोबत जोडला आहे, तसेच सदरील माहिती शुल्क नियामक प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर तसेच राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या / नोडल अधिकारी तथा संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई व आयुष संचालनालय, मुंबई यांच्या संकेतस्थळावर सर्व संबंधीतांच्या माहितीकरिता उपलब्ध आहे.

शुल्क नियामक प्राधिकरणाने निश्चित केलेल्या शुल्का व्यतिरिक्त महाविद्यालयाने अतिरिक्त शुल्काची मागणी केल्यास तसेच प्रवेश प्रक्रिये संबंधी काही तक्रार उद्‌भवल्यास संबंधीत विद्यार्थी/पालाकांनी ही बाब संबंधीत महाविद्यालयामध्ये राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे उपस्थित "निरिक्षकाच्या" निर्देशनास आणावी, तसेच विद्यार्थी/पालक यासंदर्भात ayushadm.grievance.mh@gmail.com या ईमेलवरही आपली तक्रार सादर करु शकतात.

(ए.ई. रायते) भा.प्र.से.
**आयुक्त,**
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,**
**मुंबई.**

टिप : ayushadm.grievance.mh@gmail.com हा ईमेल सदर प्रवेश प्रक्रियेकरिता फक्त अपलब्ध करुन देण्यात आला आहे, तद्‌नंतर या ईमेलवर आलेले ईमेल ग्राह्य धरण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.